RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ३३(२)] बुधवार, ऑगस्ट २४, २०१६/भाद्र २, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक ४८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.—** महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम ... ... ... पृष्ठे १–५

दिनांक २४ ऑगस्ट २०१६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात** ” दिनांक २४ ऑगस्ट २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, १९७६ आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— १९५६ चा ४७. १९५६ चा ४८. १९५६ चा ४९. १९७७ चा महा. १. १९७८ चा महा. ८.

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम, महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे निवृत्तीवेतन आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २०१६, असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम याची सुधारणा

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याचे कलम ३ बदली दाखल करणे.

**२.** महाराष्ट्र विधानपरिषद (सभापती व उप सभापती) आणि महाराष्ट्र विधानसभा (अध्यक्ष व उपाध्यक्ष) यांचे वेतन व भत्ते अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— १९५६ चा ४७.

सभापती व अध्यक्ष यांचे वेतन.

" **३.** या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, सभापतीस आणि अध्यक्षास, आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल असे, मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते मिळून होणाऱ्या वेतनाएवढे वेतन देण्यात येईल. ".

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ५ मधील पोट-कलम (२) वगळण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याचे कलम १० बदली दाखल करणे.

**४.** सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १० ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

उप सभापती व उपाध्यक्ष यांचे वेतन.

" **१०.** या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, उप सभापतीस आणि उपाध्यक्षास, आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या अपर मुख्य सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल असे, मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते मिळून होणाऱ्या वेतनाएवढे वेतन देण्यात येईल. ".

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १२ब ची सुधारणा.

**५.** सभापती व उप सभापती आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते अधिनियमाच्या कलम १२ब ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि,—

(क) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) मध्ये, " रुपये १५,००० " या मजकुराऐवजी, " रुपये २५,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) सभापतीस, अध्यक्षास, उप सभापतीस आणि उपाध्यक्षास, संगणक चालकाच्या सेवा मिळण्यासाठी दरमहा रुपये १०,००० इतकी रक्कम देण्यात येईल. ".

(ग) समास टिपेमधील, " स्वीय सहायक " या मजकुरानंतर, " आणि संगणक चालक " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा

१९५६ चा ४८. **६.** महाराष्ट्र मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याचे कलम ३ बदली दाखल करणे, मंत्री व राज्यमंत्री यांचे वेतन.

" **३.** (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, मंत्र्यास, आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल असे, मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते मिळून होणाऱ्या वेतनाएवढे वेतन देण्यात येईल.

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यातिरिक्त, राज्य मंत्र्यास, आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या अपर मुख्य सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल असे, मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते मिळून होणाऱ्या वेतनाऐवढे वेतन देण्यात येईल.".

**७.** मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याचे कलम ८ मधील, पोट-कलम (२) वगळण्यात येईल. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याचे कलम ८ ची सुधारणा.

**८.** मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याचे कलम ८अ वगळण्यात येईल. सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याचे कलम ८अ वगळणे.

**९.** मंत्र्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याच्या कलम १०क ला, त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि,— सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम १०क ची सुधारणा.

(क) अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) मध्ये, " रुपये १५,००० " या मजकुराऐवजी, " रुपये २५,००० " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) प्रत्येक मंत्र्यास, राज्य मंत्र्यास आणि उप मंत्र्यास संगणक चालकाच्या सेवा मिळण्यासाठी दरमहा रुपये १०,००० इतकी रक्कम देण्यात येईल. " ;

(ग) समास टिपेमधील, " स्वीय सहायक " या मजकुरानंतर, आणि " संगणक चालक " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

प्रकरण चार

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याची सुधारणा

१९५६ चा ४९. **१०.** महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश " विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये,— सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ३ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (१) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली नसेल त्या व्यतिरिक्त, प्रत्येक सदस्यास, आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या प्रधान सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी

सुधारणा करण्यात येईल असे, मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते मिळून होणाऱ्या वेतनाएवढे वेतन देण्यात येईल. ” ;

(ख) पोट-कलम (२) वगळण्यात येईल ;

(ग) समास टिपेमध्ये, “ आणि एकत्रित भत्ते ” हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ४ ची सुधारणा.

११. विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ४ मध्ये, “ रुपये १,००० ” या मजकुराऐवजी, “ रुपये २,००० ” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५६ चा अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

१२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते यांबाबत अधिनियम याच्या कलम ६ मध्ये,—

(क) पोट-कलम (३) मधील, “ रुपये १५,००० ” या मजकुराऐवजी “ रुपये २५,००० ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (३) नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

“ (३अ) प्रत्येक सदस्यास संगणक चालकाच्या सेवा मिळण्यासाठी दरमहा रुपये १०,००० इतकी रक्कम देण्यात येईल. ”.

(ग) पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

## प्रकरण पाच

## महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे निवृत्तिवेतन अधिनियम, १९७६ याची सुधारणा

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ३ ची सुधारणा.

१३. महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे निवृत्तिवेतन, १९७६ याच्या कलम ३ मध्ये, “ रुपये चाळीस हजार ” या मजकुराऐवजी, “ रुपये पन्नास हजार ” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७७ चा महा. १.

## प्रकरण सहा

## महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ याची सुधारणा

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याचे कलम ३ बदली दाखल करणे.

१४. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९७८ (यात, यापुढे, या प्रकरणांत, ज्याचा निर्देश “ महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम ” असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :— १९७८ चा महा. ८.

विरोधी पक्ष नेत्यांचे वेतन.

“ **३.** या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, प्रत्येक विरोधी पक्षनेत्यास आपल्या पदावधीत, महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवाला अनुज्ञेय असणारे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात येईल असे, मूळ वेतन व महागाई भत्ता आणि इतर भत्ते मिळून होणाऱ्या वेतनाएवढे वेतन देण्यात येईल. ”.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याचे कलम ३अ वगळणे.

१५. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याचे कलम ३अ वगळण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ९ ची सुधारणा.

१६. महाराष्ट्र राज्य विधानमंडळातील विरोधी पक्षनेत्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम १०अ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि,—

(क) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) मध्ये, “ रुपये १५,००० ” या मजकुराऐवजी “ रुपये २५,००० ” हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (१) नंतर पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२) प्रत्येक विरोधी पक्षनेत्यास संगणक चालकाच्या सेवा मिळण्यासाठी दरमहा रुपये १०,००० इतकी रक्कम देण्यात येईल. " ;

(ग) समास टिपेमधील, " स्वीय सहायक " या मजकुरानंतर, " आणि संगणक चालक " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.